# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक ०५/०३/२०१९ रोजी दुपारी १२.३० वाजता आयोजित केलेल्या २८४ व्या बैठकीचे स्थायी कार्यवृत्त

---

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाची २८४ वी बैठक मंगळवार, दिनांक ०५ मार्च २०१९ रोजी दुपारी १२.३० वाजता गुलझारीलाल नंदा सभागृह, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे पूर्व, मुंबई : ४०० ०५१ येथे आयोजित करण्यात आली.

**सदरहू बैठकीस खालील प्रमाणे उपस्थिती होती :---**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **मा. श्री.उदय सामंत** | : | **अध्यक्ष / प्राधिकरण** |
| २. | **मा.श्री. मिलिंद म्हैसकर** | : | **उपाध्यक्ष/प्राधिकरण** |
| ३. | **मा.श्री. संजय कुमार अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग** | : | **सदस्य/ प्राधिकरण** |

सदरहू बैठकीस विशेष निमंत्रित म्हणून खालीलप्रमाणे मंडळांचे सभापती उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **मा.श्री. मधु चव्हाण** | : | **सभापती, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.** |
| २. | **मा.श्री. विनोद घोसाळकर** | : | **सभापती, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ.** |
| ३. | **मा.श्री. विजय नाहटा** | : | **सभापती, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ.** |
| ४. | **मा.श्री. बाळासाहेब पाटील** | : | **सभापती, कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.** |

मा. डॉ. नितिन करीर, प्रधान सचिव, नगर विकास विभाग-१, तथा सदस्य / प्राधिकरण यांनी मंत्रीमंडळ बैठक असल्यामुळे सदर बैठकीस उपस्थित राहणार नसल्याचे कळविले होते. सदर अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली.

बैठकीस सुरुवात होण्यापूर्वी सचिव / प्राधिकरण यांनी मा.अध्यक्ष / प्राधिकरण यांचे तसेच सर्व सन्माननीय उपस्थितांचे स्वागत केले व मा. अध्यक्ष / प्रा. यांच्या परवानगीने विषय सुचीवरील विषय चर्चेस घेण्यात आले.

**बाब क्रमांक : २८४/१**

**विषय :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक २८/०२/२०१९ रोजी झालेल्या २८३ व्या बैठकीचे प्रारुप कार्यवृत्त स्थायी करण्याबाबत.**

---

उक्त विषय सचिव/प्राधिकरण यांनी सभागृहापुढे सादर केला.

२८३ व्या बैठकीचे प्रारुप कार्यवृत्त झालेल्या चर्चेनुसार स्थायी करण्यात आले.

**बाब क्रमांक : २८४/२**

**विषय :- प्रतिक्षा नगर सायन येथील ४० दंगलग्रस्तांना घरे देण्याविषयी प्राधिकरणाच्या आगामी गाळे देण्याबाबत बैठकीत बाब टिप्पणी सादर करणेबाबत.**

---

उक्त विषय सचिव/प्राधिकरण यांनी सभागृहापुढे सादर केला.
वरील विषयावर चर्चा होऊन उक्त विषय तहकुब करण्यास प्राधिकरणाने सहमती दर्शविली.

बाब टिप्पणीतील प्रस्तावावर चर्चा होवून

**ठराव क्रमांक : ६८५४** **दिनांक : ०५/०३/२०१९**

प्राधिकरणाने निर्णय घेतला कीं, उक्त विषय तहकुब करण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

**( मिलिंद म्हैसकर )**
**उपाध्यक्ष/ प्राधिकरण**

**( संजय कुमार )**
**सदस्य/ प्राधिकरण तथा**
**अपर मुख्य सचिव,गृहनिर्माण विभाग**

**( उदय सामंत )**
**अध्यक्ष / प्राधिकरण**

**बाब क्रमांक : २८४/३**

**विषय :- भाडेपट्टा करारनामा संपुष्टात आल्यानंतर नुतनीकरण करण्यासंबंधीचे विहीत धोरण.**

---

उक्त विषय सचिव/प्राधिकरण यांनी सभागृहापुढे सादर केला.

सदर विषयी आर्थिकदृष्टया दुर्बल घटक आणि अल्प उत्पन्न गट या दोन योजनांकरिता वेगळे धोरण ठरविण्यात यावे तसेच कमर्शिअल इमारतींकरिता वेगळे धोरण ठरवून सदर प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करण्यात यावा, अशा सूचना मा.अध्यक्ष तसेच सर्व सन्माननीय सदस्यांनी दिल्या.

**बाब क्रमांक : २८४/४**

**विषय :- मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळांतर्गत संरक्षक भिंत बांधण्याबाबतच्या निविदा मागविण्यास मंजुरी मिळण्याबाबत.**

---

उक्त विषय सचिव/प्राधिकरण यांनी सभागृहापुढे सादर केला.

वरील विषयावर चर्चा होऊन उक्त विषय तहकुब करण्यास प्राधिकरणाने सहमती दर्शविली.

बाब टिप्पणीतील प्रस्तावावर चर्चा होवून

**ठराव क्रमांक : ६८५५** **दिनांक : ०५/०३/२०१९**

प्राधिकरणाने निर्णय घेतला कीं, उक्त विषय तहकुब करण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

**( मिलिंद म्हैसकर )**
**उपाध्यक्ष/ प्राधिकरण**

**( संजय कुमार )**
**सदस्य/ प्राधिकरण तथा**
**अपर मुख्य सचिव,गृहनिर्माण विभाग**

**( उदय सामंत )**
**अध्यक्ष / प्राधिकरण**

**बाब क्रमांक : २८४/५**

**विषय :- समतानगर वसाहतीतील एकात्मिक पुर्नविकासाबाबत.**

उक्त विषय सचिव/प्राधिकरण यांनी सभागृहापुढे सादर केला.

यापूर्वी प्राधिकरणाच्या दिनांक २८/०२/२०१९ रोजी झालेल्या २८३ व्या बैठकीमध्ये सूचित केल्यानुसार मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास विकास मंडळांतर्गत समतानगर वसाहतीतील एकात्मिक पुर्नविकासाबाबत प्राधिकरणाने गठीत केलेल्या समितीने पुढील कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीबाबत प्राधिकरणास अवगत करावे, अशा सूचना देण्यात आल्या.

**बाब क्रमांक : २८४/६**

**विषय :- कर्मचाऱ्यांना मालकी हक्काने घरे देण्याबाबत.**

उक्त विषय सचिव/प्राधिकरण यांनी सभागृहापुढे सादर केला.

सहमुख्य अधिकारी / मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांनी म्हाडामध्ये कार्यरत अधिकारी / कर्मचा-यांना १३ ( २ ) अंतर्गत मालकी हक्काने घरे देण्याबाबत पहाडी गोरेगांव, पवई तसेच मुलुंड येथील जागा सूचविण्यात आल्या असल्याचे सांगितले असता यावर चर्चा होऊन सदर सूचविण्यात आलेल्या जागांची उपलब्धतेबाबत अभ्यास करुन नंतर जागा निश्चित करून ठोस प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करण्याच्या सूचना सन्माननीय सदस्यांनी दिल्या.

**बाब क्रमांक : २८४/७**

**विषय :- जाहिरात / होर्डिंग बाबत एकात्मिक धोरण निश्चित करणेबाबत.**

उक्त विषय सचिव/प्राधिकरण यांनी सभागृहापुढे सादर केला.

उक्त विषयी निवासी कार्यकारी अभियंता / मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांनी सभागृहास माहिती विशद केली असता सन्माननीय सदस्यांनी जाहिरात / होर्डिंगबाबत म्हाडाचे धोरण अस्तित्वात आहे का याची खात्री करुन नव्याने धोरण करणेकरिता मुख्य अभियंता- २ / प्राधिकरण यांच्या एक सदस्य समितीची स्थापना करणेत यावी व सदर समितीने प्राधिकरणाच्या पुढील बैठकीमध्ये प्रस्ताव सादर करणेच्या सूचना देण्यात आल्या.

वरील विषयावर चर्चा होवून

**ठराव क्रमांक : ६८५६** **दिनांक : ०५/०३/२०१९**

जाहिरात / होर्डिंगबाबत म्हाडाचे धोरण अस्तित्वात आहे का याची खात्री करुन नव्याने धोरण करणेकरिता मुख्य अभियंता- २ / प्राधिकरण यांची एक सदस्य समिती गठीत करण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे. सदर समितीने सर्वंकष अभ्यास करुन नव्याने धोरण तयार करावे व सदर धोरण प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत मान्यतेकरिता सादर करावे.

सदर ठराव कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**(मिलिंद म्हैसकर)**
**उपाध्यक्ष/ प्राधिकरण**

**( संजय कुमार )**
**सदस्य/ प्राधिकरण तथा**
**अपर मुख्य सचिव,गृहनिर्माण विभाग**

**(उदय सामंत )**
**अध्यक्ष / प्राधिकरण**

**बाब क्रमांक : २८४/८**

**विषय :- छपरा चाळ पुनर्विकास.**

-------------------------

उक्त विषय सचिव/प्राधिकरण यांनी सभागृहापुढे सादर केला.

मुख्य अधिकारी / मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांनी उक्त विषयी विशद केले कीं, उपरोक्त मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी मुख्य अधिकारी / दुवपु मंडळ यांचे पत्र क्र.निकाअ/ नाहप्र/ न.क्र.१५०५/१२४०/दुवपु-०७, दि.१७.०३.२००७ (चटई क्षेत्र निर्देशांक २.५०) अन्वये ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले आहे. तसेच मुख्य अधिकारी, दुवपु मंडळ यांनी संयुक्त मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी पत्र क्र.निकाअ/नाहप्र/न.क्र.१५०५ & १५३०/२५७१/दुवपु-०९, दि.१५.०६.२००९ (चटई क्षेत्र निर्देशांक २.५०) अन्वये ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान केले आहे. उपरोक्त मालमत्तेवर ०२ उपकर प्राप्त इमारती असून, त्यामध्ये एकूण १४३ भाडेकरु / रहिवाशी आहेत. सदर इमारतीच्या पुनर्विकासासाठी महानगरपालिकेने आयओडी/नकाशे दि.१९.०७.२००७ रोजी मंजूर केले आहे व प्रत्यक्ष काम आरंभ करण्याचे प्रमाणपत्र दि.१७.०७.२००८ रोजी देण्यात आलेले आहे. तसेच महानगरपालिकेने सुधारित नकाशे दि.०८.०३.२०११ रोजी मंजूर केले आहे.

विकासकाने सर्व भाडेकरु / रहिवाश्यांना तात्पुरत्या पर्यायी जागेसाठी भाडे देऊन, स्थलांतरण केले व तद्नंतर जुन्या इमारती तोडून नविन इमारतीचे काम सुरु केले होते. परंतू ७ व्या मजल्यापर्यंतचे काम पुर्ण केल्यानंतर, अर्धवट अवस्थेत सोडून दिले. जुन्या इमारतीतील भाडेकरु / रहिवाशी हे गेल्या ६ ते ७ वर्षापासुन इतरत्र राहत असून, त्यांच्या नविन इमारतीचे काम अद्याप पुर्ण झालेले नाही. विकासकाने भाडेकरु / रहिवाश्यांचे भाडे देणे बंद केले आहे. त्यामुळे भाडेकरु / रहिवाश्यांना आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे.

मा.आमदार श्री.सदा सरवणकर यांनी दि.१५.०७.२०१५ रोजीच्या पत्रान्वये मा.मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे केलेल्या तक्रारीनुसार मुख्य अधिकारी / दुवपु मंडळ यांच्या दालनात छप्परा बिल्डींग या इमारतींच्या पुनर्विकासाच्या संदर्भात मा.आमदार महोदयासोबत व इमारतीतील भाडेकरु / रहिवाशी यांची संयुक्त बैठक बोलविण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये भाडेकरु / रहिवाशी यांनी असे सांगितले की, विकासक श्री.उदय सुर्वे हे इमारतीचे काम पूर्ण करत नाहीत. ७ व्या मजल्यापर्यंत काम पूर्ण झालेले असून, सद्य:स्थितीत काम बंद आहे. तसेच विकासक गेल्या २ वर्षापासून भाडेकरु / रहिवाश्यांस तात्पुरत्या निवासस्थानासाठी भाडे देत नाही. त्यामुळे रहिवाश्यांना जीवन जगणे दुरापास्थत झालेले आहे. आम्ही कर्ज काढून दुसऱ्या जागेचे भाडे भरत आहोत. तसेच विकासक हा दिवाळखोरीत निघाल्यामुळे व आर्थिक घोटाळयामुळे सध्या तुरुंगवासात आहे. त्यांचे इतर भागीदार अथवा वारसदार पुनर्विकास काम पूर्ण करण्याबाबत पुढे येत नाही. यावर मंडळाने तोडगा काढण्याबाबत विनंती केली आहे.

मा.मंत्री महोदयांनी दिलेल्या निर्देशानुसार, दि.२३.०५.२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता मुख्य अधिकारी, दुवपु मंडळ यांचे अध्यक्षतेखाली गुलझारीलाल नंदा सभागृह, गृहनिर्माण विभाग, तिसरा मजला, कलानगर, वांद्रे-पूर्व, मुंबई ४०० ०५१ येथे बैठक आयोजित केली होती.

दि.२३.०५.२०१६ रोजी मुख्य अधिकारी / दुवपु मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली, त्यात सविस्तर चर्चा करुन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.

सदर बैठकीस इमारतीचे भाडेकरु / रहिवाशी हजर होते विकासकाच्या वतीने त्यांचे वास्तुशास्त्रज्ञ श्री.जोशी व श्री.पुरोहित त्यांचे प्रतिनिधी म्हणून हजर होते. उपस्थित असलेल्या भाडेकरु / रहिवाश्यांनी असे सांगितले की, विकासकाने त्यांच्या इमारतींच्या पुर्नविकासाचे काम अर्धवट अवस्थेत सोडलेले आहे व गेली ३ ते ४ वर्षांपासून काम बंद आहे. तसेच विकासकाने त्यांना पर्यायी जागेसाठी बऱ्याच महिन्यांपासून भाडेही दिलेले नाही. त्यामुळे, त्यांना अतिशय त्रास सहन करावा लागत आहे. विकासकाचे प्रतिनिधी यांनी असे सांगितले की, निधी अभावी त्यांचे काम बंद आहे व लवकरच यावर उपाययोजना करुन काम सुरु करण्यात येईल. मुख्य अधिकारी, दुवपु मंडळ यांनी रहिवाश्यांच्या समस्या व तक्रारी ऐकून घेतल्या. त्यानंतर, विकासकांच्या प्रतिनिधीशी चर्चा करुन, असा निर्णय घेण्यात आला की, विकासकाने पुढील आठ दिवसाच्या आत सर्व रहिवाशांना त्यांचे थकीत भाडे देण्यात यावे व बंद पडलेले काम त्वरीत सुरु करण्यासाठी उपाययोजना करावी. तसे न केल्यास सर्व रहिवाशांनी (एकूण - १४३ भाडेकरु) त्यांच्या सहीने एक निवेदन मुख्य अधिकारी, दुवपु मंडळ यांना द्यावे. जेणेकरुन, त्याआधारे पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. मा.आमदार श्री.सदा सरवणकर यांनी असे सांगितले की, विकासकाने अर्धवट अवस्थेत सोडलेल्या कामामुळे रहिवाशांचे बरेचसे हाल होत आहेत. तसेच त्यांना पर्यायी जागेसाठी कबूल केलेले भाडे विकासकाने न दिल्यामुळे रहिवाशी आर्थिक अडचणीत पडलेले आहेत. त्यामुळे, विकासकास मंडळाने प्रदान केलेले ना-हरकत प्रमाणपत्र रद्द करण्यात यावे व उर्वरित कामासाठी शासनाने निधी उपलब्ध करुन द्यावा व उर्वरित काम म्हाडातर्फे हाती घेण्यात यावे. मुख्य अधिकारी, दुवपु मंडळ यांनी अशी माहिती दिली की, विकासकाने काम अर्धवट अवस्थेत सोडलेले आहे व उर्वरित काम मंडळातर्फे जर करावयाचे ठरल्यास त्यासाठी मंडळाने प्रदान केलेले ना-हरकत प्रमाणपत्र रद्द करावे लागेल. तद्नंतर म्हाड अधिनियमातील तरतुदींनुसार सदर मालमत्तेच्या भुसंपादनाची कार्यवाही करावी लागेल. परंतु तसे करताना किती कालावधी लागेल हे सांगता येत नाही. तसेच भुसंपादनाच्या कार्यवाहीविरुध्द विकासक मंडळाविरुध्द न्यायालयात जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

मा.ना.श्री.सुभाष देसाई, मा.उद्योगमंत्री (महाराष्ट्र राज्य) तथा पालक मंत्री, मुंबई शहर जिल्हा यांनी दि.०९.०५.२०१६ रोजीच्या पत्राव्दारे कळविल्यानुसार व मा.राज्यमंत्री यांनी दिलेल्या निर्देशानुसार दि.२३.०५.२०१६ रोजी भाडेकरु / रहिवाशी, विकासक व दुरुस्ती मंडळाच्या अधिकाऱ्यासोबत झालेल्या संयुक्त बैठकीतील चर्चेनुसार म्हाडाने माहिम आणि दादर येथील विकासकाने बंद ठेवलेल्या किंवा अर्धवट अवस्थेत ठेवलेल्या पुर्नविकास प्रकल्पांवर धोरण निश्चित करण्याबाबत शासनाच्या गृहनिर्माण विभागाकडे परिपूर्ण प्रस्ताव या कार्यालयाचे पत्र क्र.मुअ/ निकाअ/ विनिनि३३(७)/८६९१/दुवपु-२०१६ दि.०२.११.२०१६ रोजीच्या पत्रान्वये सादर केला आहे.

याबाबत शासनाने दि.२९.१०.२०१६ रोजी मुंबई शहरातील मोडकळीस आलेल्या व धोकादायक असलेल्या उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास जलद गतीने होण्यासाठी ०८ आमदारांची समिती गठित केली आहे. सदर आमदाराच्या समितीची दि.१९.०९.२०१७ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये समिती सदस्यांनी मुंबई बेटावरील रखडलेल्या / बंद पडलेल्या / अर्धवट सोडलेल्या योजना लवकरात लवकर कार्यान्वित करण्याबाबत उपाय योजना सुचविलेल्या होत्या. त्या अनुषंगाने मंडळाने दि.१३.१०.२०१७, दि.२६.१०.२०१७ व दि.०९.१०.२०१८ रोजीच्या पत्रान्वये म्हाड अधिनियम कलम ७७, ९१, ९५(अ), ९६, १८० व १०३(ब) तसेच विकास नियंत्रण नियमावली ३३(७) व ३३(९) सुधारणा सुचविलेल्या असून, त्या शासन स्तरावर विचाराधिन आहे. सदर सुधारणा अंतिम झाल्यानंतर, कार्यवाही करण्यात येईल.

सदर पुनर्विकासाचे काम अर्धवट अवस्थेत सोडल्यामुळे, भाडेकरु / रहिवाशी श्रीमती प्रभा आत्माराम आनंदे व इतर यांनी मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.३१७/२०१८ महाराष्ट्र शासन व इतर तसेच विकासक यांचेविरुध्द दाखल केली आहे. मा.उच्च न्यायालयाने सर्व बाजु ऐकल्यानंतर, दि.०९.०१.२०१९ रोजी खालीलप्रमाणे आदेश पारित केले आहे.

> **"In this situation, we find that the interest of justice can be met with by directing respondent No. 1 & 2 to promptly look in to their grievance and suitable decision according as per Law. If necessary, opportunity of hearing be extended to Respondent No.4(present Developer). If respondent No. 2 has not already forwarded the proposal for substitution of builder & for completion of project, we permit respondent No.2 to do so within a period of three weeks from today. If such proposal is received, Respondent No. 1 shall take suitable decision within a period of 3 months from the date of receipt of such proposal. If such proposal is already received within 3 months from the date of communication of this order, respondent No 1 shall take suitable decision on the grievance of petitioners as per law."**

मा.उच्च न्यायालयाने उपरोक्त आदेशान्वये मंडळास व शासनास उपरोक्त मालमत्तेची पुनर्विकास योजना पुर्ण करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. सदर आदेशानुसार याचिकाकर्त्यां भाडेकरु / रहिवाशी व विकासक यांची संयुक्त बैठक दि.२१.०२.२०१९ रोजी मुख्य अधिकारी, दुवपु मंडळ यांच्या दालनात संपन्न झाली. सदर बैठकीस भाडेकरु / रहिवाशी उपस्थित होते. परंतू विकासक उपस्थित राहिले नाहीत. उपस्थित असलेल्या भाडेकरु / रहिवाश्यांनी असे सांगितले की, विकासक हे अर्धवट अवस्थेत सोडलेले इमारतीचे काम पूर्ण करण्यासाठी पुढे येत नाही. त्यामुळे मंडळाने सदर मालमत्ता संपादित करुन, उर्वरित काम पूर्ण करण्याची विनंती केली. तसेच भाडेकरु / रहिवाश्यांनी मंडळाने त्यांना संक्रमण शिबीरामध्ये पर्यायी जागा द्यावी, अशी विनंती केली आहे.

उपरोक्त मालमत्तेचे पुनर्विकासाचे काम पुर्ण करण्याच्या दृष्टीने मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, सदर मालमत्ता भुसंपादित करण्याबाबतचा प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश कार्यकारी अभियंता/ग-उत्तर विभाग, दुवपु मंडळ यांना देण्यात आलेले आहे. सदर प्रस्ताव प्राप्त होताच शासन

गृहनिर्माण विभागास मालमत्ता भुसंपादित करण्यासाठी सादर करण्यात येईल. तसेच भाडेकरु / रहिवाश्यांनी केलेल्या विनंतीनुसार त्यांना मंडळाच्या संक्रमण शिबीरामध्ये तात्पुरती पर्यायी व्यवस्था म्हणून गाळे वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

**प्रस्ताव:**

(अ) मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.३१७/२०१८ मध्ये दि.०९.०१.२०१९ रोजीच्या आदेशान्वये दिलेल्या निर्देशानुसार उपरोक्त मालमत्ता भुसंपादित करण्याचा प्रस्ताव शासन गृहनिर्माण विभागास सादर करणे.

(ब) भुसंपादनाच्या प्रस्तावास शासनाने मान्यता दिल्यानंतर, मंडळाने पुनर्विकासासाठी मे.शुभ इंटरप्रायझेस यांना विकास नियंत्रण निमयावली ३३(७) मधील तरतुदीनुसार सदर मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी प्रदान केलेले ना-हरकत प्रमाणपत्र रद्द करणे.

(क) मंडळाने ना-हरकत प्रमाणपत्र रद्द केल्यानंतर, जुन्या इमारतीतील भाडेकरु / रहिवाश्यांना मंडळाच्या संक्रमण शिबीरामध्ये तात्पुरती पर्यायी व्यवस्था म्हणून मंडळातर्फे गाळे वितरीत करणे.

उपरोक्त बाब प्राधिकरणाच्या अवलोकनार्थ व निर्णयार्थ सादर करण्यात आली असल्याचे सांगितले.

वरील विषयावर चर्चा होवून

**ठराव क्रमांक : ६८५७** **दिनांक : ०५/०३/२०१९**

प्राधिकरणाने निर्णय घेतला कीं, सदर मालमत्तेच्या पुनर्विकासाचे काम ना-हरकत प्रमाणपत्रधारकांने सुरु करुन, अर्धवट अवस्थेत सोडले असून, गेली ४ ते ५ वर्षे काम बंद आहे. तसेच मुळ भाडेकरु / रहिवाश्यांना पर्यायी जागेपोटीचे भाडे देणे विकासकाने बंद केले आहे. अशा परिस्थितीत पुनर्विकासाचे काम मंडळाने पुर्ण करण्याच्या दृष्टीने तसेच मुळ भाडेकरु / रहिवाश्यांचे पुनर्वसन व्हावे, यासाठी प्राधिकरण एकमताने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

(अ) मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.३१७/२०१८ मध्ये दि.०९.०१.२०१९ रोजीच्या आदेशान्वये दिलेल्या निर्देशानुसार उपरोक्त मालमत्ता भुसंपादित करण्याचा प्रस्ताव मंडळाने शासन गृहनिर्माण विभागास सादर करावा.

(ब) भुसंपादनाच्या प्रस्तावास शासनाने मान्यता दिल्यानंतर, मंडळाने पुनर्विकासासाठी मे.शुभ इंटरप्रायझेस यांना विकास नियंत्रण नियमावली ३३(७) मधील तरतुदीनुसार सदर मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी प्रदान केलेले ना-हरकत प्रमाणपत्र रद्द करावे.

(क) मंडळाने ना-हरकत प्रमाणपत्र रद्द केल्यानंतर, जुन्या इमारतीतील भाडेकरु / रहिवाश्यांना मंडळाच्या संक्रमण शिबीरामध्ये तात्पुरती पर्यायी व्यवस्था म्हणून मंडळातर्फे गाळे वितरीत करावे. तसेच

संपादन प्रक्रिया झालेनंतर म्हाडाचे ताब्यात जमीन प्राप्न झाल्यानंतर म्हाडातर्फे इमारतीचा पुनर्विकास करण्याबाबत कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

( मिलिंद म्हैसकर )
उपाध्यक्ष/ प्राधिकरण

( संजय कुमार )
सदस्य/ प्राधिकरण तथा
अपर मुख्य सचिव,गृहनिर्माण विभाग

(उदय सामंत )
अध्यक्ष / प्राधिकरण

**बाब क्रमांक : २८४/९**

**विषय :- मंत्रालय परिसरामध्ये म्हाडा करीता कार्यालय उपलब्ध करुन देण्याबाबत.**

उक्त विषय सचिव/प्राधिकरण यांनी सभागृहापुढे सादर केला.

वरील विषयावर चर्चा होऊन उक्त विषय तहकुब करण्यास प्राधिकरणाने सहमती दर्शविली.

**ठराव क्रमांक : ६८५८** **दिनांक : ०५/०३/२०१९**

प्राधिकरणाने निर्णय घेतला कीं, उक्त विषय तहकुब करण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

( मिलिंद म्हैसकर )
उपाध्यक्ष/ प्राधिकरण

( संजय कुमार )
सदस्य/ प्राधिकरण तथा
अपर मुख्य सचिव,गृहनिर्माण विभाग

(उदय सामंत )
अध्यक्ष / प्राधिकरण

विषयसूचीवरील विषयांवर चर्चा करुन निर्णय घेतल्यानंतर माननीय अध्यक्ष यांनी उपस्थित सन्माननीय सभापती व सदस्यांचे आभार मानले व बैठक समाप्त झाल्याचे जाहीर केले.

**( मिलिंद म्हैसकर )**
**उपाध्यक्ष/ प्राधिकरण**

**( संजय कुमार )**
**सदस्य/ प्राधिकरण तथा**
**अपर मुख्य सचिव,गृहनिर्माण विभाग**

**( उदय सामंत )**
**अध्यक्ष / प्राधिकरण**